# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेस नोट

## ➢ स्वच्छतेच्या जनजागृतीसाठी आयोजित Plog Run 2024 ला मिरा भाईंदरकरांचा अभुतपुर्व प्रतिसाद

केंद्रीय गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय (MOHUA) भारत सरकार यांनी स्वच्छ भारत अभियान 2.0 अंतर्गत स्वच्छता पंधरवडा मार्फत स्वच्छता ही सेवा (स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता) ही मोहीम 17 सप्टेंबर 2024 ते 2 ऑक्टोबर 2024 पर्यंत मिरा-भाईंदर शहरात राबविण्यात येत आहे. शहरातील नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली 1 ऑक्टोंबर 2024 रोजी सकाळी 8.00 वाजता सुरू झालेले प्लॉग रनचे आयोजन करण्यात आले होते या plog run 2024 नागरिकांनी उदंड प्रतिसाद दिल्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिका आयोजित या उपक्रमात एक वेगळाच उत्साह नी जोश पाहायला मिळाला.

सर्व साधारणपणे 4000 हजार नागरिकांनी यात सहभाग नोंदवला होता. एकाच वेळी 6 ठिकाणाहून सुरू झालेले plog run 2024 विविध ठिकाणी मार्गस्थ होत असताना स्वच्छता करत करत जात होते. सकाळी 8.00 वाजता मॅक्सेस मॉलला सुरू झालेले plog run 2024 नगर भवन, हनुमान मंदिर, मनपा आयुक्त बंगला, शहीद मेजर कोस्तुभ राणे मिरारोड, एस. के. स्टोन आणि शेवटी गोल्डन नेस्टला याचा समारोप झाला. या Plog run 2024 चे वैशिष्ट म्हणजे यावेळी प्लास्टिक ची अंत्ययात्रा काढण्यात आली होती या यात्रे दरम्यान “प्लॅस्टिकचा वापर टाळा प्रदूषणाला आळा” या संदेशाद्वारे नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. तसेच शालेय विद्यार्थ्यांनी बनलेल्या 50 प्रतिकात्मक महात्मा गांधीजींच्या माध्यमातून कचरा वर्गीकरण विषयी जनजागृती करत plog run 2024 मार्गस्थ होत होता.तर महाविद्यालय विद्यार्थ्यांनी स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता या विषयक पथनाट्य सादर करण्यात येत होते. जिथे Plog run 2024 समारोप झाला तिथे सगळ्यांनी स्वच्छता विषयक शपथ घेतली शून्य प्लास्टिक वापर टाळण्यासाठी 4000 कपड्याच्या पिशव्यांचे वाटप मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे करण्यात आले. या plog run 2024 मध्ये मीरा-भाईंदर शहरातील अनेक NGO तसेच शाळा/ महाविद्यालय मोठ्या संख्येने सहभागी झाले होते भाईंदर सेकंडरी स्कूल ,एसटी विन्सेंट डी पौल हायस्कूल, आदर्श शाळा राई ,डॉन बॉस्को स्कूल, जांगिड स्कूल, के एस मेहता स्कूल , मीरा -भाईंदर महानगरपालिका शाळा क्रमांक 19 दाचकुल पाडा, भारतरत्न उस्ताद बिस्मिल्ला खान उर्दू महानगरपालिका शाळा, दालमिया हायस्कूल, प्राथमिक शाळा क्रमांक 14 पेणकर पाडा, ग्रामीण आदिवासी शाळा मिरे,डॉन बॉस्को हायस्कूल प्लेझंट पार्क , सेंट फ्रांसिस शाळा,लोकमान्य विद्यालय, सेंड सोल्जर इंग्लिश स्कूल ,भाईंदर सेकंडरी स्कूल, एस् एल पोरवाल स्कूल, रीना मेहता कॉलेज ऑफ आर्ट्स ,एल आर तिवारी डिग्री कॉलेज, सरदार वल्लभाई पटेल स्कूल, बी एम एस इंग्लिश स्कूल एन एस एस, शांतीनगर हायस्कूल, सेंट हॅरी हायस्कूल अंजुमन उर्दू, हायस्कूल मनपा शाळा क्रमांक 34 सेंट अँथोनी हायस्कूल, शंकर नारायण कॉलेज शंकर नारायण कॉलेज ,एन ए स्कूल ,एन एच इंग्लिश स्कूल ,जेम्स स्कूल नूरजहा स्कूल, रॉयल इंटरनॅशनल, डॉन बॉस्को हायस्कूल शांती पार्क मिरा रोड, अन्मेच इंग्लिश स्कूल नवघर तर NGO मध्ये चाइल्ड एड फाउंडेशन,चाइल्ड हेल्प फाउंडेशन ,राधे राधे ,मेकिंग द डिफरन्स NGO, मिरा भाईंदर सायकलिस्ट असोसिएशन, अमर नटगोर्ट, मस्जिद फाउंडेशन, डॉक्टर अझीमुद्दीन फाउंडेशन यांनी या plog run 2024 आपला सहभाग नोंदवला होता

तसेच मिरा भाईंदर शहरातील नागरिक, सामाजिक सेवाभावी संस्था, बचत गट तसेच राजकारणातील पुढारी आणि पत्रकार यांच्या समवेत मिरा भाईंदर महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. Plog run 2024 ला नागरिकांनी दिलेले अभुतपुर्व उत्साह आणि प्रतिसाद पाहिल्यावर स्वच्छता ही सेवा अंतर्गत स्वच्छते विषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित केलेल्या या plog run 2024 चा मुख्य हेतू खऱ्या अर्थाने सार्थकी लागला असे मत मनपा आयुक्तांनी व्यक्त केले.